
**किसानपुत्र भाऊबीज - कार्यक्रम अहवाल**






**पुणे** - पुणे जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यामुळे एकल झालेल्या महिलांना किसानपुत्र भाऊबीज देण्यात आली. शेतकरी आत्महत्यामुळे एकल झालेल्या भगिनींसाठी उदयकाळ फाउंडेशन अंतर्गत किसानपुत्रांनी भाऊबीज साजरी केली.

दरवर्षी प्रमाणे उदयकाळ फाउंडेशन संस्थेने किसानपुत्रांची भाऊबीज कार्यक्रम पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबातील महिलांना त्यांची दिवाळी गोड होण्यासाठी त्यांना किराणा साहित्य आणि त्यांच्या बालकांसाठी 'लाडोबा' मासिकाचा दिवाळी अंक भेट दिला.
या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मा. कमल तिवारी, प्राध्यापक NDA, पुणे), डॉ.शारदा तिवारी, श्री. सतीश देशमुख, किसानपुत्र आंदोलन, श्री. राम माने, सचिव - आंतर भारती, पुणे, श्री. बाळकृष्ण बागुल, अध्यक्ष - उदयकाळ फाउंडेशन, सौ. प्रभावती बागुल, सौ. सिमा गुत्ते, सामाजिक कार्यकर्ते व युवा सामाजिक कार्यकर्ते मयूर बागुल हे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात उपस्थित महिलांनी आपले मनोगत सांगत असतांना कौटुंबिक जबाबदारी आणि मुलांचा सांभाळ करत असतांना असंख्य समस्या आणि अडचणी येत असतात. किसानपुत्र आंदोलन यांनी हा उपक्रम राबवला आणि आमची आणि मुलांची दिवाळी गोड होण्यासाठी आम्हांला भाऊबीज भेट दिली त्याबद्दल आभार मानले.
या उपक्रमात मुलांना चपराक प्रकाशन संस्थेचा लाडोबा बाल साहित्य दिवाळी अंक मुलांना साहित्यिक दिवाळी भेट दिला. चपराक प्रकाशन संस्थेचे श्री. घनश्याम पाटील यांनी दिवाळी निमित्ताने बालकांना सुट्टीचा विविध गोष्टी आणि कथा यांचा साहित्यिक खाऊ भेट यानिमित्ताने दिला.
एकूण १४७ महिलांना दिवाळी किराणा साहित्य किट संपूर्ण महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात वाटप होत आहे.
या कार्यक्रमाची संकल्पना आदरणीय अमर हबीब सर आणि हा कार्यक्रम साठी आर्थिक योगदान मिळून देण्यासाठी सर्व किसानपुत्र आंदोलनातील सहकारी यांनी प्रयत्न केले. श्री. राजू बसर्गीकर यांनी त्यांच्या मित्र परिवाराने मोठे योगदान दिले. विविध जिल्ह्यातील महिलांना मदत पोहचण्यासाठी श्री. हेरंब कुलकर्णी सर यांनी सहकार्य केले.





पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील सोनेसांगवी गावातील महिला



पुणे शहरातील वाघोली येथील महिला

**नाशिक** - नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील शेतकरी आत्महत्या मुळे एकल झालेल्या महिलांना किसानपुत्र भाऊबीज देण्यात आली.

उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील नांदगाव येथील शेतकरी आत्महत्या मुळे एकल झालेल्या ७ महिलांना दिवाळी घरी मुलां सोबत गोड होण्यासाठी किराणा किट देण्यात आले. महिलांना दिवाळी सुरु होण्याआधी दिवाळी गोड होण्यासाठी साहित्य उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांना आनंद झाला. रोजच्या कौटुंबिक जीवनात दिवाळी सणानिमित्त मिळालेली वस्तू मुळे मुलांना दिवाळी गोड करुन खाऊ घालता येईल असे बोलून दाखवले.





**छत्रपती संभाजीनगर** - किसानपुत्रांची भाऊबीज - दादेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथील आशाबाई पंढरी गाडे व अंजाबाई गोसावी या दोन गरजू महिलांना दिवाळी सनानिमित्त उदयकाळ फाउंडेशन तर्फे किराणा किट भेट देण्यात आले. दादेगांव शाळेचे शिक्षक श्री. बनसोडे सर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.




**परभणी** - उदयकाळ फाऊंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज परभणी जिल्ह्यातील ताडकळस येथील शेतकरी आत्महत्या मुळे एकल झालेल्या महिलांना मुलांबळांची दिवाळी गोड होण्यासाठी किराणा साहित्य किट देण्यात आले.

दिवाळीचा सण सर्व ठिकाणी गोड आनंदाने साजरा केला जातो. गावाकडे कमी पैश्यात अधिक श्रम केले जाते. त्यात जे कमवतो त्यात दिवाळी गोड कशी होणार. किसानपुत्रांनी दिलेली भाऊबीज मुळे खऱ्या अर्थाने दिवाळी सण गोड साजरा होईल आणि एकटपणा जो होता तो किसानपुत्र सोबत असल्याने आता नसेल असे मत महिलांनी मांडले.



**देसाईगंज** - दिवाळीच्या सणानिमित्त एकल महिलांच्या कुटुंबीयांकरिता राशन किटचे वाटप - आरोग्य प्रबोधिनी उपक्रम

आरोग्य प्रबोधिनी व उदयकाळ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य प्रबोधिनी वडसा येथे एकल महिलांच्या कुटुंबीयांची दिवाळी सुद्धा गोड व्हावी हे उद्देश समोर ठेवून एक छोटीशी भेट म्हणून एकल महिलांना राशन किटचे वाटप करण्यात आले.

किसानपुत्रांची भाऊबीज उपक्रमाच्या अंतर्गत एकल महिलांना निमित्ताने राशन किट वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितांमध्ये आरोग्य प्रबोधिनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश गभने, प्रमुख उपस्थितीमध्ये सहसंचालक अर्चना गभणे, देसाईगंज येथील केबल ऑपरेटर व्यावसायिक कल्पना रवींद्र डोंगरवार व कार्यकर्त्या गीता बाळकृष्ण मेश्राम हे उपस्थित होते.

कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून यांना बोलवण्याचे मुख्य उद्देश म्हणजे ह्या महिला स्वतः एकल असून त्यांनी त्यांच्या पतीच्या मृत्यूनंतर पतीचे सुरू असलेले काम त्या आजही स्वतः आवडीने करत आहेत. त्यांच्या या कार्यापासून दुसऱ्याही महिलांना प्रोत्साहन मिळावे व इतरही महिलांनी न घाबरता हे काम पुरुषाचे आहे स्त्रियांचे नाही अशी मनामध्ये न्यूनगंड न बाळगता स्वतः आपल्या कुटुंबाकरिता खंबीरपणे उभे राहून कामांमध्ये कोणताही भेदाभेद न करता सर्व कामे करावे हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश होते.

श्रीमती गीता मेश्राम यांनी पती निधनानंतर मुलींचे संगोपन योग्य करण्याचे सोबतच आपली सामाजिक बांधिलकी निभावली हा प्रवास सांगितला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात सर्व एकल महिलांच्या परिचयाने करण्यात आले.

प्रास्ताविक आरोग्य प्रबोधिनीचे कार्यकर्ते पुष्पांजली मातेरे, संचालन प्रितेश जांभुळकर व आभार आरती पुराम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सविता झाडे व सर्व एकल विधवा महिलांनी आपली उपस्थिती दर्शवून सहकार्य केले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुळकर्णी व उदयकाळ फाउंडेशनचे मयूर बागुल यांचे विशेष सहयोग लाभले.




आरोग्य प्रबोधिनी
आरोग्य प्रबोधिनी व उदयकाळ फाउंडेशन
आयोजित
किसानपुत्रांची भाऊबीज
PRITESH


आरोग्य प्रबोधिनी व उदयकाळ फाउंडेशन

**अहिल्यानगर** - रविवार दिनांक २७/१०/२०२४ रोजी साऊ एकल महिला नेवासा तालुका समितीच्या माध्यमातून उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपत्रांची भाऊबीज या कार्यक्रमात नेवासा तालुक्यातील एकूण १३ महिलांना दिवाळी भाऊबीज निमित्त किराणा वाटप करण्यात आले.
कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी कावीळ उपचार केंद्राचे प्रमुख श्री सुनीलराव वाबळे व प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र शेठ बाफना (कुकाणा) हे होते. समितीचे समन्वयक कारभारी गरड , अप्पासाहेब वाबळे, भारत आरगडे, रेणुकाताई चौधरी, येडुभाऊ सोनवणे, राजेंद्र चिंधे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.






**नांदेड -** उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज यांच्या अंतर्गत नांदेड येथे मिशन वासल्य समिती व जिल्हा समन्वयक श्री. अंकुश खानसोळे सर आणि साऊ एकल महिला समितीच्या अध्यक्षा शकीला शेख मॅडम यांच्या हस्ते एकल महिलांना दीपावली भाऊबीज सणानिमित्त रेशन किटचे वाटप केले.

एकल महिलांच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी होऊन त्यांना आपल्या दुःखातून सावरण्याकरिता कशा पद्धतीने मदत करता येईल यासाठी समाजसेविका म्हणून शकीलाताई आणि पाठीराखा भाऊ म्हणून अंकुश दादा नेहमीच प्रयत्नशील असतात. त्याच प्रयत्नांची फलश्रुती म्हणून रेशनकिटचे वाटप करून शकीलाताई आणि अंकुश दादा यांनी हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. कार्यक्रमाच्या वेळी नुसते रेशनकिट देऊन महिलांना परत न पाठवता त्यांचे आयुष्य कशा पद्धतीने उज्वल बनविता येईल या पद्धतीने मार्गदर्शन करून स्वयंरोजगार ,स्वाभिमानी जीवन जगण्याची आयुष्यभर पुरेल अशी शिदोरी त्यांनी आज एकल महिलांना दिली.





**बुलडाणा -** उदयकाळ फाउंडेशन किसानपुत्रांची दिवाळी यांच्यासह संयुक्त विद्यमाने आज दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी मौजे घारोड ता खामगाव जिल्हा बुलढाणा येथील १३ एकल निराधार महिलांन दिवाळी भाऊबीज निमित्त किराणा किट चे वितरण करण्यात आले यावेळी अध्यक्षस्थानी शाहू फुले आंबेडकर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा साऊ एकल महिला पुनर्वसन बुलडाणा जिल्हा समन्वयक सचिन ठाकरे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये निसर्ग मित्र पक्षी निसर्ग संवर्धन अभ्यासक संजय गुरव सर सरपंच वैभव ठाकरे तंटामुक्ती अध्यक्ष भिकाजी राऊत, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गजानन परकाळे, नारायण महानकार, पत्रकार प्रवीण ठाकर, सुनील इंगोले आदींसह मान्यवर उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांनी उदयकाळ फाउंडेशन शेतकरी पुत्रांची दिवाळी यांच्या वतीने गरीब निराधार महिलांसाठी किराणा वस्तूंचे वितरण केले
त्यानंतर कार्यक्रमाचे विशेष सहकार्य करणाऱ्या आदरणीय मयूर बागुल सर यांचे सर्व मान्यवरांनी आभार मानले.





**नंदुरबार -** उदयकाळ फाऊंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज नंदुरबार जिल्ह्यातील धडगावं येथे आदिवासी बांधव यांच्या सोबत साजरी करण्यात आली.

गावांची नावे - भगदरी, काढी, खुंटामोडी, सुर्यपूर, नवागाव, रोषमाळ बुद्रुक इ.

आदिवासी कुटुंब दिवाळी सण साजरा फारसे करत नाही. गोड पदार्थ करून खाणे असे कधी फारसे करत नसतात. त्यांना किराणा किट देऊन त्यांनी गोड पदार्थ केला नसता. दिवाळी सण प्रत्येक व्यक्ती नवीन कपडे खरेदी करत असतो. आम्ही सर्व ताईंना लागणारी व वापरली जाऊ शकते ते द्यावे. या विचारांनी महिलांना दिवाळी भाऊबीज निमित्ताने साडी देण्यात आली. किसानपुत्रांची भाऊबीज खऱ्या अर्थाने शेतकरी आत्महत्या मुळे एकल झालेल्या महिलांना कधी एकटे वाटणार नाही किसानपुत्र सदैव सोबत आहेत.






**विविध प्रसार माध्यमांनी घेतलेली दखल**

लोकमत



भेंडा येथे एकल महिलांना दीपावलीनिमित्त किराणा साहित्याचे वाटप केले.

# दीपावलीनिमित्त एकल महिलांना किराणा वाटप

## भेंडा येथे उदयकाळ फाउंडेशनचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**भेंडा :** आर्थिक परिस्थिती अडचणीची असणाऱ्या एकल महिलांना नेवासा तालुका साऊ एकल महिला समितीच्या माध्यमातून उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज या उपक्रमांतर्गत दीपावलीसाठी मोफत किराणा मालाचे वाटप रविवारी भेंडा येथे करण्यात आले.

भेंडा (ता. नेवासा) येथील नागेबाबा भक्तनिवासामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कावीळ उपचार केंद्राचे संचालक सुनील वाबळे, प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र बाफना उपस्थित होते. तालुक्यातील एकल महिला व त्यांच्या मुलांच्या विविध समस्या सोडविणे, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यासाठी लागणारी विविध कागदपत्रे मिळविण्यास मदत करणे, यासाठी समितीचे कार्यकर्ते सेवाभावी वृत्तीने काम करत असल्याचे कारभारी गरड यांनी प्रास्ताविकातून सांगितले.

समितीच्या माध्यमातून सोडविलेल्या विविध समस्या, दूर केलेल्या अडचणी व सहकार्य यांबाबत येडूभाऊ सोनवणे, अप्पासाहेब वाबळे, भारत आरगडे यांनी माहिती दिली. एकल महिलांच्या समस्या सोडविताना काही आर्थिक सहकार्याची गरज लागल्यास आम्ही मदत करू, असे आश्वासन सुनील वाबळे, राजेंद्र बाफना यांनी यावेळी दिले. एकल महिलांनी असणाऱ्या विविध समस्या सांगितल्या. एकल महिला समितीच्या समन्वयक रेणुकाताई चौधरी यांनी आभार मानले.

Ahmednagar Main
Page No. 4 Oct 28, 2024
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

## संक्षिप्त



भेंडा : नेवासा तालुका साऊ एकल महिला समितीने दिवाळीसाठी एकल महिलांना किराणा साहित्य वाटप केले.

## दिवाळीनिमित्त एकल महिलांना किराणा वाटप

**भेंडा :** आर्थिक परिस्थिती अडचणीची असणाऱ्या एकल महिलांना नेवासा तालुका साऊ एकल महिला समितीच्या माध्यमातून उदयकाळ फाउंडेशन आयोजित किसानपुत्रांची भाऊबीज या उपक्रमांतर्गत दिवाळीसाठी किराणा मालाचे मोफत वाटप करण्यात आले. भेंडा येथील नागेबाबा भक्तनिवासमध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनीलराव वाबळे होते. सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र बाफना यावेळी उपस्थित होते. कारभारी गरड यांनी प्रास्ताविक केले. येडूभाऊ सोनवणे, अप्पासाहेब वाबळे, भारत आरगडे यांचेही भाषण झाले. एकल महिलांना आर्थिक मदत करण्याचे आश्वासन वाबळे व बाफनाा यांनी दिले. रेणुकाताई चौधरी यांनी आभार मानले.

Ahmednagar Edition
Oct 28, 2024 Page No. 07
Powered by: erelego.com

लोकमत

# विधवांना दिवाळीनिमित्त धान्य किट वाटप; चेहऱ्यावर फुलला आनंद

## देसाईगंजात उपक्रम : आरोग्य प्रबोधिनीने घेतला पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** आरोग्य प्रबोधिनी व उदयकाळ फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने देसाईगंज येथे आरोग्य प्रबोधिनी कार्यालय परिसरात विधवांच्या कुटुंबीयांची दिवाळी सुद्धा गोड व्हावी, हा उद्देश समोर ठेवून धान्य किट वाटप करण्यात आले. किसान पुत्रांची भाऊबीज उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाला आरोग्य प्रबोधिनी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश गभणे, प्रमुख उपस्थितीमध्ये सहसंचालिका अर्चना गभणे, देसाईगंज येथील व्यावसायिक कल्पना रवींद्र डोंगरवार व कार्यकर्त्या गीता बाळकृष्ण मेश्राम उपस्थित होते. गीता मेश्राम यांनी पतीच्या निधनानंतर मुलींचे योग्य संगोपन करीत आपली जबाबदारी पार पाडली. त्यांनी आपला संघर्ष कथन केला. दरम्यान, सर्व एकल महिलांनी परिचय दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या पुष्पांजली मातेरे यांनी, तर सूत्रसंचालन प्रीतेश जांभुळकर यांनी केले. आभार आरती पुराम यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सविता झाडे व सर्व एकल महिलांनी सहकार्य केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुळकर्णी व उदयकाळ फाउंडेशनचे मयूर बागुल यांचे विशेष सहकार्य लाभले.




महिलांना धान्यकिट वाटप करताना अर्चना गभणे, कल्पना डोंगरवार.

### पतीच्या निधनानंतर पत्नी सांभाळत आहेत काम

- एकल महिला पतीच्या मृत्यूनंतर पतीचे सुरू असलेले काम आजही स्वतः आवडीने करीत आहेत. त्यांच्या या कार्यापासून दुसऱ्याही महिलांना प्रोत्साहन मिळावे व इतरही महिलांनी न घाबरता हे काम पुरुषाचे आहे, स्त्रियांचे नाही, अशी मनामध्ये न्यूनगंड न बाळगता स्वतः आपल्या कुटुंबाकरिता खंबीरपणे उभे राहून कामांमध्ये कोणताही भेदाभेद न करता सर्व कामे करावीत, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

Hello Gadchiroli
Page No. 4 Oct 29, 2024
Powered by: erelego.com

# माहिती सेवा प्रबोधन

माहिती अधिकार जनजागृतीसाठी व सेवा दातृत्वाची सेवा देणारे एकमेव वृत्तपत्र

RNI : MAHMAR/2017/71836 | (MINISTRY OF INFORMATION & BROADCASTING) | 29/10/2024

संपादक : श्री चंद्रकांत गोविंद वारघडे (मो.९९६०९२५२५२) | कार्यकारी संपादक : श्री प्रशांत रामदास भागवत (मो.९८९०९२१३४०)


# उदयकाळ फाउंडेशन कडून किसान पुत्रांची भाऊबीज साजरी



**प्रतिनिधी : ज्ञानेश्वर पाटेकर**

शेतकरी आत्महत्यामुळे एकल झालेल्या भगिनींसाठी उदयकाळ फाउंडेशन अंतर्गत किसानपुत्रांनी भाऊबीज साजरी केली. दरवर्षी प्रमाणे उदयकाळ फाउंडेशन संस्थेने किसानपुत्रांची भाऊबीज कार्यक्रम पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबातील महिलांना त्यांची दिवाळी गोड होण्यासाठी त्यांना किराणा साहित्य आणि त्यांच्या बालकांसाठी 'लाडोबा' मासिकाचा दिवाळी अंक भेट दिला.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे मा. कमल तिवारी, प्राध्यापक NDA, पुणे), डॉ.शारदा तिवारी, श्री. सतीश देशमुख, किसानपुत्र आंदोलन, श्री. राम माने, सचिव - आंतर भारती, पुणे, श्री. बाळकृष्ण बागुल, अध्यक्ष - उदयकाळ फाउंडेशन, सौ. प्रभावती बागुल, सौ. सिमा गुत्ते, सामाजिक कार्यकर्ते व युवा सामाजिक कार्यकर्ते मयूर बागुल हे उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमात उपस्थित महिलांनी आपले मनोगत सांगत असतांना कौटुंबिक जबाबदारी आणि मुलांचा सांभाळ करत असतांना असंख्य समस्या आणि अडचणी येत असतात. किसानपुत्र आंदोलन यांनी हा उपक्रम राबवला आणि आमची आणि मुलांची दिवाळी गोड होण्यासाठी आम्हांला भाऊबीज भेट दिली त्याबद्दल आभार मानले.या उपक्रमात मुलांना चपराक प्रकाशन संस्थेचा लाडोबा बाल साहित्य दिवाळी अंक मुलांना साहित्यिक दिवाळी भेट दिला. चपराक प्रकाशन संस्थेचे श्री. घनश्याम पाटील यांनी दिवाळी निमित्ताने बालकांना सुट्टीचा विविध गोष्टी आणि कथा यांचा साहित्यिक खाऊ भेट यानिमित्ताने दिला. एकूण १२५ महिलांना दिवाळी किराणा साहित्य किट संपूर्ण महाराष्ट्र मधील शेतकरी आत्महत्या मुळे एकल झालेल्या महिलांना दिवाळी भाऊबीज दिली.पुणे, अहिल्यानगर, नांदेड, गडचिरोली, परभणी, नंदुरबार , नाशिक, बुलढाणा या कार्यक्रमाची संकल्पना आदरणीय अमर हबीब सर आणि हा कार्यक्रम साठी आर्थिक योगदान मिळून देण्यासाठी सर्व किसानपुत्र आंदोलनातील सहकारी यांनी प्रयत्न केले.

श्री. राजू बसर्गीकर यांनी त्यांच्या मित्र परिवाराने मोठे योगदान दिले. विविध जिल्ह्यातील महिलांना मदत पोहचण्यासाठी श्री. हेरंब कुलकर्णी सर यांनी सहकार्य केले. मयुर बागुल यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

सकाळ



धडगाव : एकल महिलांबरोबर भाऊबीज साजरी करताना मान्यवर.

# सातपुड्यातील एकल महिलांसोबत भाऊबीज

## उदयकाळ फाउंडेशन- याहामोगी संस्थेचा पुढाकार

■ सकाळ वृत्तसेवा

तळोदा, ता. ५ : दिवाळीचे औचित्य साधून अमळनेर येथील उदयकाळ फाउंडेशन व धडगाव येथील याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्थेतर्फे सातपुड्यातील एकल महिलांसोबत भाऊबीज साजरी करण्यात आली. या वेळी एकल महिलांना साडी, बेडशीट व दिवाळीसाठी गोड खाऊ भेट देण्यात आला. यामुळे एकल महिलांनी समाधान व्यक्त केले.

नवागाव येथील कल्पना पावरा, सूर्यफूल येथील फुंती पावरा, रोषमाळ बुद्रुक येथील प्रमिला पावरा, जुने धडगाव येथील वैशाली पराडके, खुंटामोडी येथील रेखा राठोड, काठी येथील सविता पाडवी, भगदरी येथील अंजना पाडवी या एकल महिलांची याहामोगी संस्थेच्या अध्यक्षा वंदना पावरा, फिरत्या दवाखान्याच्या परिचारिका रंजना नवेज सिस्टर, काठी संस्थानचे राजूभाऊ पाडवी यांनी विधिवत पूजा व ओवाळणी करून त्यांची ओटी भरली.

या वेळी नंदुरबार बालकल्याण समितीचे माजी अध्यक्ष विठ्ठल कदम यांनी भगिनींना मुलांच्या आरोग्याबरोबर स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत व मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगितले. संपूर्ण धैर्य एकवटून संसाराचा गाडा चालविण्यास शुभेच्छा दिल्या.

शासनाच्या 'बाल संगोपन' योजनेतून दोन मुलांसाठी प्रत्येकी दरमहा दोन हजार २५० रुपये मिळतील. त्यासाठी अर्ज करण्यास सुचविले. या वेळी शिक्षक मगन परमार, अंगणवाडी सेविका कौसल्या पाडवी व सीता पाडवी, आशा सुपरवायझर संगीता पाडवी, आशा कार्यकर्ती प्रेमलता पाडवी, ललिता पाडवी, कौसल्या पाडवी व शशिकांत परमार उपस्थित होते. मयूर बागूल यांनी भाऊबीज कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले. किशोरी समन्वयक रूषा पाडवी, पायलट सचिन पावरा यांनी आयोजन केले.

Dhule, Dhule-Today
06/11/2024 Page No. 4

पुण्य नगरी

# सातपुड्यात किसान पुत्रांची भाऊबीज

## एकल महिला झाल्या भावूक; साडी, मिठाई देवून दिवाळी केली गोड



**धडगाव:** कोरोना काळात घरातील कर्ता पुरुषाचे निधन झाल्याने महिला विधवा झाल्या.यामुळे त्यांचा संसार उघड्यावर आला.अशा एकल महिलांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. अमळनेर येथील मयूर बागुल यांनी 'उदयकाळ फाऊंडेशन' तसेच धडगाव येथील याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्थेच्यावतीने 'किसान पुत्राची भाऊबीज' एकल महिलांना साडी, बेडशीट व दिवाळीसाठी मिठाई देत दिवाळी गोड केली.

यावेळी कल्पना सुरेश पावरा (नवागाव), फुंती दिलीप पावरा (सूर्यपुर ), प्रमिला प्रकाश पावरा (रोषमाळ बु), वैशाली अमोल पराडके (जुने धडगाव), रेखा गणेश राठोड (खुंटामोडी), सविता जयसिंग पाडवी (काठी ), अंजना अमृत पाडवी ( भगदरी) या एकल महिलांची याहामोगी संस्थेच्या अध्यक्षा वंदना पावरा, फिरत्या दवाखान्याच्या परिचारिका रंजना नवेज सिस्टर, काठी संस्थानचे राजुभाऊ पाडवी यांनी विधिवत पूजा व ओवाळणी करून त्यांची ओटी भरली.यावेळी बालकल्याण समितीचे माजी अध्यक्ष विठ्ठल कदम यांनी भगिनींना मुलांच्या आरोग्याबरोबर स्वतःचे आरोग्याची काळजी घेण्यास व मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगितले. शासनाच्या 'बाल संगोपन' योजनेतून दोन मुलांसाठी प्रत्येकी दरमहा २२५० रुपये मिळणार असल्याने अर्ज करण्याचे आवाहन केले.यावेळी मगन परमार (शिक्षक), कौसल्या पाडवी, सीता पाडवी ( अंगणवाडी सेविका), संगीता पाडवी ( आशा सुपर वायझर), प्रेमलता पाडवी, ललिता पाडवी, कौसल्या पाडवी (आशा कार्यकर्ती),शशिकांत परमार उपस्थित होते. मयूर बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली रूपा पाडवी (किशोरी समन्वयक),पायलट सचिन पावरा यांनी आयोजन केले.

नवराष्ट्र

-दत्तात्रय सूर्यवंशी-
9423497275

# एकल महिलांना साडीचोळी वाटप

तळोदा, (वा.) कोरोनामध्ये कितीतरी महिलांचे पती मयत झाले. त्यामुळे त्यांचा संसार उघड्यावर आला.सोबत ४ ते ५ वर्षांची लहान मुले, उत्पन्नाचे साधन नाही अशा महिलांना शासनाचा जीआर काढून एकल महिला म्हणून संबोधण्यात यावे, यासाठी यशस्वी प्रयत्न केले.

दिवाळीचे औचित्य साधत अमळनेर जिल्हा जळगाव येथील मयूर बागुल यांनी ' उदयकाळ फाऊंडेशन ' तसेच धडगाव येथील याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्थेच्या वतीने 'किसान पुत्राची भाऊबीज' एकल महिलांना साडी,बेडशीट व दिवाळीसाठी गोड खाऊ देऊन साजरी केली.

यावेळी कल्पना सुरेश पावरा (नवागाव), कुंती दिलीप पावरा ( सुर्यपुर ),प्रमिला प्रकाश पावरा (रोषमाळ बु),वैशाली अमोल पराडके (जुने धडगाव), रेखा गणेश राठोड (खुंटामोडी), सविता जयसिंग पाडवी (काठी ),अंजना अमृत पाडवी ( भगदरी) या एकल महिलांची याहामोगी संस्थेच्या अध्यक्षा वंदना पावरा, फिरत्या दवाखान्याच्या परिचारिका रंजना नवेज सिस्टर, काठी संस्थानचे राजुभाऊ पाडवी यांनी विधिवत पूजा व ओवाळणी करून त्यांची ओटी भरली. यावाळी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

# सातपुड्यात एकल महिलांची भाऊबीज : एक भावुक क्षण



दैनिक स्वतंत्र भारत

**नंदुरबार । प्रतिनिधी**

जागतिक महामारी - कोरोना मध्ये कितीतरी महिलांचे पती मयत झाले त्यामुळे त्यांचा संसार उघड्यावर आला.सोबत ४ - ५ वर्षाची लहान लहान मुले,उत्पन्नाचे साधन नाही म्हणून अकोले जिल्हा अहील्यानगर येथील शिक्षक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी संपूर्ण महाराष्ट्रात फिरून या महिलांसाठी आर्थिक मदत,विविध प्रकारच्या उत्पन्न





वाढीच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी यासाठी 'मिशन वात्सल्य' योजना तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील प्रमोद झिजाडे यांनी या महिलांना विधवा म्हणू नये,त्यांचे कुंकू पुसू नये, बांगड्या फोडू नये. त्यांना घरातील प्रत्येक सण,उत्सव,पूजा यामध्ये मानाचे स्थान मिळावे म्हणून शासनास जी आर काढून त्यांना एकल महिला म्हणून संबोधण्यात यशस्वी प्रयत्न केले.

या दिवाळीचे औचित्य साधत अमळनेर जिल्हा जळगाव येथील श्री मयूर बागुल यांनी 'उदयकाळ फाऊंडेशन' तसेच धडगाव येथील याहामोगी आदिवासी बहुउद्देशीय विकास संस्थेच्या वतीने 'किसान पुत्राची भाऊबीज' एकल महिलांना साडी,बेडशीट व दिवाळीसाठी गोड खाऊ देऊन साजरी केली.

यावेळी कल्पना सुरेश पावरा (नवागाव), कुंती दिलीप पावरा (सूर्यपुर ), प्रमिला प्रकाश पावरा (रोषमाळ बु).वैशाली अमोल पराडके (जुने धडगाव), रेखा गणेश राठोड (खुंटामोडी), सविता जयसिंग पाडवी (काठी ),अंजना अमृत पाडवी ( भगदरी) या एकल महिलांची याहामोगी संस्थेच्या अध्यक्षा वंदना पावरा,फिरत्या दवाखान्याच्या परिचारिका रंजना नवेज सिस्टर,काठी संस्थानचे राजुभाऊ पाडवी यांनी विधिवत पूजा व ओवाळणी करून त्यांची ओटी भरली. यावेळी विठ्ठल कदम माजी अध्यक्ष बाल कल्याण समिती नंदुरबार यांनी भगिनींना मुलांच्या आरोग्या बरोबर स्वतः चे आरोग्याची काळजी घेण्यास व मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगितले.संपूर्ण धैर्य एकवटून संसाराचा गाडा चालविण्यास शूभेच्छा दिल्या तसेच शासनाच्या 'बालसंगोपन' योजनेतून दोन मुलांसाठी प्रत्येकी दरमहा २२५० रुपये मिळतील त्यासाठी अर्ज करण्यास सुचविले. यावेळी मगन परमार (शिक्षक), कौसल्या पाडवी सीता पाडवी (अंगणवाडी सेविका), संगीता पाडवी ( आशा सुपर वायझर), प्रेमलता पाडवी ललिता पाडवी कौसल्या पाडवी (आशा कार्यकर्ती), शशिकांत परमार उपस्थित होते. भाऊबीज कार्यक्रमाचे मार्गदर्शन मयूर बागुल यांनी तर आयोजन रुपा पाडवी (किशोरी समन्वयक), पायलट सचिन पावरा यांनी केले.



# धन्यवाद